एकात्मिक रोग सर्वेक्षण कार्यक्रम, महाराष्ट्र
सार्वजनिक आरोग्य विभाग

# नवीन करोना विषाणू (कोविड -१९) - सद्य:स्थिती आणि उपाय योजना

दिनांक ३ मे २०२०

प्रेस नोट

---

**थोडक्यात महत्वाचे -**

- आज ११५ रुग्ण बरे होऊन घरी, राज्यात आजपर्यंत एकूण २११५ करोना बाधित रुग्ण बरे होऊन घरी
- आज राज्यात ६७८ नवीन रुग्णांचे निदान
- आज राज्यात २७ करोना बाधित रुग्णांचा मृत्यू
- राज्यातील एकूण रुग्ण १२,९७४

**करोना बाधित रुग्ण**

आज राज्यात ६७८ नवीन रुग्णांची नोंद झाली. यामुळे राज्यातील करोना बाधित रुग्णांची संख्या १२,९७४ झाली आहे. राज्यातील जिल्हा आणि मनपानिहाय रुग्णांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे

| अ.क्र | जिल्हा महानगरपालिका | बाधित रुग्ण | मृत्यू |
|---|---|---|---|
| १ | मुंबई महानगरपालिका | ८८०० | ३४३ |
| २ | ठाणे | ६० | २ |
| ३ | ठाणे मनपा | ४८८ | ७ |
| ४ | नवी मुंबई मनपा | २१६ | ४ |
| ५ | कल्याण डोंबवली मनपा | २१२ | ३ |
| ६ | उल्हासनगर मनपा | ४ | ० |
| ७ | भिवंडी निजामपूर मनपा | २१ | २ |
| ८ | मीरा भाईंदर मनपा | १४१ | २ |
| ९ | पालघर | ४४ | १ |
| १० | वसई विरार मनपा | १५२ | ४ |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | रायगड | ३० | १ |
| १२ | पनवेल मनपा | ५५ | २ |
| | ठाणे मंडळ एकूण | १०२२३ | ३७१ |
| १३ | नाशिक | १२ | ० |
| १४ | नाशिक मनपा | ४३ | ० |
| १५ | मालेगाव मनपा | २२९ | १२ |
| १६ | अहमदनगर | २७ | २ |
| १७ | अहमदनगर मनपा | १६ | ० |
| १८ | धुळे | ८ | २ |
| १९ | धुळे मनपा | २० | १ |
| २० | जळगाव | ३४ | ११ |
| २१ | जळगाव मनपा | १२ | १ |
| २२ | नंदूबार | १२ | १ |
| | नाशिक मंडळ एकूण | ४१३ | ३० |
| २३ | पुणे | ८१ | ४ |
| २४ | पुणे मनपा | १२४३ | ९९ |
| २५ | पिंपरी चिंचवड मनपा | ७२ | ३ |
| २६ | सोलापूर | ७ | ० |
| २७ | सोलापूर मनपा | १०९ | ६ |
| २८ | सातारा | ३७ | २ |
| | पुणे मंडळ एकूण | १५४९ | ११४ |
| २९ | कोल्हापूर | १० | ० |
| ३० | कोल्हापूर मनपा | ६ | ० |
| ३१ | सांगली | २९ | ० |
| ३२ | सांगली मिरज कुपवाड मनपा | २ | १ |
| ३३ | सिंधुदुर्ग | ३ | १ |
| ३४ | रत्नागिरी | ११ | १ |
| | कोल्हापूर मंडळ एकूण | ६१ | ३ |
| ३५ | औरंगाबाद | ५ | ० |
| ३६ | औरंगाबाद मनपा | २३९ | ९ |
| ३७ | जालना | ८ | ० |

| | | | |
|---|---|---|---|
| ३८ | हिंगोली | ४२ | ० |
| ३९ | परभणी | १ | १ |
| ४० | परभणी मनपा | २ | ० |
| | औरंगाबाद मंडळ एकूण | २९७ | १० |
| ४१ | लातूर | १२ | १ |
| ४२ | लातूर मनपा | ० | ० |
| ४३ | उस्मानाबाद | ३ | ० |
| ४४ | बीड | १ | ० |
| ४५ | नांदेड | ० | ० |
| ४६ | नांदेड मनपा | ३१ | १ |
| | लातूर मंडळ एकूण | ४७ | २ |
| ४७ | अकोला | १२ | १ |
| ४८ | अकोला मनपा | ५० | ० |
| ४९ | अमरावती | ३ | १ |
| ५० | अमरावती मनपा | ३१ | ९ |
| ५१ | यवतमाळ | ७९ | ० |
| ५२ | बुलढाणा | २१ | १ |
| ५३ | वाशिम | २ | ० |
| | अकोला मंडळ एकूण | १९८ | १२ |
| ५४ | नागपूर | ६ | ० |
| ५५ | नागपूर मनपा | १४६ | २ |
| ५६ | वर्धा | ० | ० |
| ५७ | भंडारा | १ | ० |
| ५८ | गोंदिया | १ | ० |
| ५९ | चंद्रपूर | ० | ० |
| ६० | चंद्रपूर मनपा | ४ | ० |
| ६१ | गडचिरोली | ० | ० |
| | नागपूर एकूण | १५८ | २ |
| | इतर राज्ये | २८ | ४ |
| | एकूण | १२९७४ | ५४८ |

*( टीप – ही माहिती केंद्र सरकारच्या सूचनेनुसार,  कोविड१९ पोर्टलवरील प्रयोगशाळांनी  दिलेल्या कोविड १९ बाधित  रुग्णांच्या माहितीनुसार तयार करण्यात आलेली आहे. )*

**मृत्यू –**

आज राज्यात २७ करोना बाधित रुग्णांचा मृत्यू झाला आहे. आज झालेल्या मृत्यूपैकी मुंबई मधील २१, पुण्यातील ४ , भिवंडीतील १, आणि  नवी मुंबईमधील १ मृत्यू आहे.

**मृत्यूंबद्दल अधिकची माहिती –**

आज झालेल्या मृत्यूंपैकी १६ पुरुष तर ११ महिला आहेत. आज झालेल्या २७ मृत्यूपैकी ६० वर्षे किंवा त्यावरील १४  रुग्ण आहेत तर १०  रुग्ण हे वय वर्षे ४० ते ५९ या वयोगटातील आहेत. तर ३ जण ४० वर्षांखालील आहे.  या २७ रुग्णांपैकी १३ जणांमध्ये ( ४८ %)  मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयरोग, अशा स्वरुपाचे अतिजोखमीचे आजार आढळले आहेत. कोविड १९ मुळे राज्यात झालेल्या मृत्यूंची संख्या आता ५४८ झाली आहे.

**प्रयोगशाळा तपासण्या –**

आजपर्यंत पाठविण्यात आलेल्या १,७०,१३९ नमुन्यांपैकी १,५६,०७८ जणांचे प्रयोगशाळा नमुने करोना करता निगेटिव्ह आले आहेत तर १२,९७४ जण पॉझिटिव्ह आले आहेत. केंद्र सरकारच्या विश्लेषणानुसार सध्या राज्यात दर दहा लाख लोकसंख्येमागे कोविड १९ प्रयोगशाळा चाचणीचे प्रमाण १२३७ एवढे आहे. हेच प्रमाण देशपातळीवर ८०३ इतके आहे.

**क्लस्टर कंटेनमेंट कृतियोजना –**

राज्यातील ज्या भागात रुग्णांचे क्लस्टर सापडले आहेत त्या ठिकाणी केंद्र सरकारच्या मार्गदर्शनानुसार क्लस्टर कंटेनमेंट कृतियोजना अंमलात आणण्यात येत आहे. राज्यात सध्या ९९७ कंटेनमेंट झोन क्रियाशील असून आज एकूण ११,०७८ सर्वेक्षण पथकांनी  काम केले असून त्यांनी ५१.०५ लाख  लोकसंख्येचे सर्वेक्षण केलेले आहे.

**इतर महत्वाचे मुद्दे -**

१. आजपर्यंत राज्यातून २११५ रुग्णांना ते बरे झाल्याने घरी सोडण्यात आले आहे.

२. सध्या राज्यात १,८१,३८२ लोक होम क्वारंटाईनमध्ये असून १३,१५८ लोक संस्थात्मक क्वारंटाईनमध्ये आहेत.

| **हा अहवाल ३ मे २०२० च्या अद्ययावत आकडेवारीवरुन तयार करण्यात आलेला आहे.** | |
|---|---|
| राज्य नियंत्रण कक्ष | ०२०/२६१२७३९४ टोल फ्री क्रमांक १०४ |